| Newspaper | Page No. | Date |
|---|---|---|
| Lokmat | 08 | 24-07-2014 |



मस्त : विशेष ध्वनिवर्णित 'थ्री इडियटस' हा चित्रपट अनुभवताना पुणे अंधशाळेतील विद्यार्थी.

## आगळा प्रयोग : विशेष ध्वनिवर्णित चित्रपटाचे प्रदर्शन

# दृष्टिहीनांनी 'पाहिला' थ्री इडियट्स

पुणे : अंधजन चित्रपट ऐकतात; पण आज त्यांनी तो अनुभवला. 'थ्री इडियट्स' या धमाल; पण संदेश देणाऱ्या चित्रपटाचे आगळे सादरीकरण अंधशाळेतील विद्यार्थ्यांसाठी झाले. चित्रपटासोबत दृश्यांचे वर्णन केले जात असल्याने चित्रपट पाहिल्याचा अनुभव या मुलांना आला. 'उन्मुक्त' या उपक्रमात अंध मुलांचे चित्रपट न पाहण्याचे बंध आज सुटले. या चित्रपटाविषयी 'मस्त' अशी त्यांची प्रतिक्रिया होती.

अंध विद्यार्थ्यांसाठी एस्सार ग्रुप फाउंडेशन या संस्थेने हा उपक्रम केला. विशेष ध्वनिवर्णित (कॉमेंट्री) चित्रपटाचे प्रदर्शन शाळेच्या सभागृहात ठेवले होते. पहिली ते दहावीच्या विद्यार्थ्यांनी त्याची मौज लुटली. या ध्वनिवर्णित तंत्रामध्ये चित्रपटातील जी दृश्ये अंधांना समजणार नाहीत, अशा ठिकाणी अतिरिक्त आवाजाद्वारे वर्णन केले जाते, त्यामुळे अंधजन इतरांची मदत न घेता चित्रपटाचा आनंद घेऊ शकतात. कोरेगाव पार्कमधील पुणे अंधशाळेत हा उपक्रम झाला. अशा प्रकारे ध्वनिवर्णित संपादन करून चित्रपट दाखविणारी 'एस्सार' ही देशातील पहिलीच कंपनी असून राज्यात अशा प्रकारचा प्रयोग प्रथमच झाला, असे सांगण्यात आले.

अमोल माकर याने चॅनलवरुन झालेले प्रक्षेपण आणि आजचा अनुभव वेगळा असल्याचे सांगितले. आदेश भालेराव याने चित्रपट संपल्यानंतर या आगळ्या श्रोत्यांवरचा परिणाम आजमावला. 'एस्सार' कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी मितेश शहा, मनुष्यबळ विकास विभागाचे प्रमुख मुकुंद जहागीरदार, सीएसआर व्यवस्थापक रवींद्र वाघमारे यांनी मुलांना प्रश्न विचारले. 'पिक्चर कसा होता?' या प्रश्नावर सामूहिकपणे 'मस्त' असे उत्तर आल्यानंतर संयोजकांच्या चेहऱ्यावरही आनंद झळकला. 'पुन्हा याच पद्धतीने कोणता पिक्चर पाहणार?' या प्रश्नावर लहान मुलांनी 'तारे जमीं पर' अशी फर्माईश केली. (प्रतिनिधी)

## मुले म्हणाली ऑल इज वेल...

१ मार्ग योग्य असेल तर या जगात अशक्य असे काहीच नाही, असा संदेश देणाऱ्या 'थ्री इडियट्स'मधील ४ पात्रांची कथा या मुलांना खूप आवडलेली दिसली. ज्यांना दृष्टी आहे, त्यांनीही मुद्दाम डोळे बंद करून हा चित्रपट अनुभवला.

२ अनेकांना 'आल इज वेल' हे गाणे आवडले. हिरो कोण होता? या प्रश्नावर आमीर खान हे उत्तर आले. अमिषा पटेल ही हिरॉईन असल्याचेही काहींनी न विचारताच सांगितले. (करिना कपूर ही खरे तर हिरॉईन आहे).

३ संदीप जाधव या दहावीतील विद्यार्थ्याने 'आल इज वेल' हे गाणे नेहमी ऐकत असतो, आज पिक्चर अनुभवला, असे हर्षभरित मुद्रेने सांगितले.

४ 'व्हायरस' या पात्राचे काम आवडल्याचे अक्षय मवळ याने सांगितले. अविनाश शिंदे, ऋषिकेश राजमाने यांनीही चित्रपट खूप आवडल्याचे सांगितले.